
दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता




vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | सोमवार दि.२६ जानेवारी २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक १५३ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Monday 26 January 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 153 | Pages 4 | Rate 4 Rs

# हिंद-दी-चादर:गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या बलिदानातून मानवी मूल्यांच्या रक्षणाची प्रेरणा- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## ३५० व्या शहीदी समागमनिमित्त कार्यक्रमाला लाखो भाविकांची उपस्थिती








दैनिक वादळ वाता
**नांदेड (वृत्तसंस्था)**


हिंद-दी-चादर गुरू तेग बहादुर साहिबजी यांचे बलिदान मानवी मूल्यांसाठी होते.त्यांचे बलिदान आपल्याला सत्य, धर्म आणि मानवी मूल्यांच्या रक्षणासाठी निर्भीडपणे उभे राहण्याची प्रेरणा देते. त्यामुळेच त्यांचे विचार राज्यातील जनतेपर्यंत पोहोचविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. नांदेड येथील मोदी मैदानावर आयोजित 'हिंद दी चादर' श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. ते म्हणाले की, गुरू तेग बहादुर साहिबजी यांनी दिलेले बलिदान हे केवळ शीख धर्मासाठी नव्हते, तर या देशाची संस्कृती, सभ्यता, विचारधारा आणि धर्म यांच्या रक्षणासाठी होते. त्यांचा पराक्रम, वीरता, शौर्य आणि सर्वोच्च बलिदानाला अभिवादन करण्यासाठी लाखोंच्या संख्येने समाज नांदेडच्या ऐतिहासिक भूमीत एकत्र आला आहे. गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या बलिदानामुळे संपूर्ण देशात धर्म, स्वातंत्र्य आणि आत्मसन्मानासाठी लढण्याची नवी चेतना निर्माण झाली. त्यांचा गौरवशाली इतिहास सर्वांपर्यंत पोहचावा, यासाठी शहीदी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा केवळ एक दिवसाचा कार्यक्रम नसून प्रत्येक गावात, वाड्या-वस्त्यांवर जावून श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांचा इतिहास घराघरात पोहचवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. शीख गुरूंचा इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचे काम राज्य शासनाने हाती घेतले आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.श्री गुरु नानक देवजींना मानणारा, त्यांच्या विचारांवर श्रद्धा ठेवणारा सर्व समाज एकत्र आणण्याचा हा प्रयत्न आहे. देशाच्या विपरीत परिस्थितीत श्री गुरु नानक देवजींनी एकत्र बांधणारा, भेदाभेद नष्ट करणारा महान विचार दिला आहे. त्या विचारांनी संपूर्ण देशात विविध समाजांना जोडण्याचे काम केले. हा विचार घेवून सर्व समाजाला एकत्र आणण्याचा प्रयत्न या कार्यक्रमाच्या माध्यमातून होत आहे.संत नामदेव महाराज हे महाराष्ट्रातील महान संत होते. त्यांची समाधी पंजाबमधील घुमान येथे आहे. संत नामदेवांनी मांडलेले विचार, त्यांचे अभंग आणि पंक्ती यांना श्री गुरु ग्रंथ साहिबमध्ये स्थान मिळाले आहे. त्यांचे विचार गुरुबाणीचा अविभाज्य भाग बनले आहेत. यामुळे महाराष्ट्रातील वारकरी परंपरा आणि शीख समाज यांच्यातील अनोखे, अतूट नाते अधिक दृढ झाले आहे. श्री गुरु गोविंद सिंघ महाराजांच्या दीर्घकाळ वास्तव्याने नांदेडची भूमी पावन झाली आहे. या भूमीने सामाजिक सलोखा अधिक मजबूत करण्याचे काम केले असल्याचा उल्लेख मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला.

# तळोदा शहर 'तिरंगामय'! तरुणांच्या मागणीला नगराध्यक्षांचा सकारात्मक प्रतिसाद

## प्रजासत्ताक दिनानिमित्त मुख्य रस्त्यांवर आकर्षक विद्युत रोषणाई; शहरवासीयांमध्ये उत्साहाचे वातावरण

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार | दिपक गोसावी**

तळोदा शहरात प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून देशभक्तीचे अभूतपूर्व वातावरण पाहायला मिळत आहे. शहरातील तरुणांनी केलेल्या मागणीची दखल घेत नवनियुक्त नगराध्यक्षा भाग्यश्री चौधरी यांनी शहरातील मुख्य रस्ते आणि चौकांमध्ये तिरंगी एलईडी दिव्यांची आकर्षक रोषणाई केली आहे. या उपक्रमामुळे शहराच्या सौंदर्यात भर पडली असून नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.शहरातील भोई गल्ली परिसरातील तरुण तुषार जोहरी, सचिन भोई व नीरज भोई यांनी ८ जानेवारी रोजी नगराध्यक्षांना एक निवेदन दिले होते. प्रजासत्ताक दिनानिमित्त शहरातील मुख्य चौकांत तिरंगा लाईटिंग करावी, जेणेकरून नागरिकांमध्ये राष्ट्रभक्तीची



भावना दृढ होईल आणि शहराची प्रतिमा सुशासित व आधुनिक नगर म्हणून उभी राहील, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली होती.तरुणांच्या या विधायक मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत नगराध्यक्षा भाग्यश्री चौधरी यांनी स्वतः जातीने लक्ष घालून ही योजना कार्यान्वित केली. शहरातील प्रमुख स्मारक चौक ते बसस्थानक आणि बिरसा मुंडा चौक या परिसरातील सर्व वीज खांबांवर केसरी, पांढरा आणि हिरव्या रंगाच्या एलईडी पट्ट्यांची सजावट करण्यात आली आहे.या तिरंगी सजावटीमुळे संध्याकाळनंतर अवघे तळोदा शहर उजळून निघत आहे. शहरात प्रवेश करताना एखाद्या मोठ्या महानगरात आल्याचा अनुभव नागरिकांना येत आहे. या प्रेरणादायी उपक्रमामुळे पाहुण्यांवरही शहराची चांगली छाप पडत आहे. आपल्या मागणीची त्वरित दखल घेतल्याबद्दल सचिन भोई, तुषार जोहरी व नीरज भोई यांनी नगराध्यक्षांचे आभार मानले आहेत.


# नारळाच्या वाणासोबतच नात्यांची गुंफण तळोद्यात गुजर महिलांचा 'रंगारंग' स्नेहसोहळा

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार | दिपक गोसावी**

नुसतीच हळद-कुंकवाची देवाणघेवाण नाही, तर सुप्त गुणांचा आविष्कार आणि 'मैत्रिणींच्या मेळ्या'चा अनोखा संगम नुकताच तळोदा शहरात पाहायला मिळाला. तळोदा शहर दोडे गुजर महिला समाजाच्या वतीने मकर संक्रांतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या स्नेहसंमेलनाने आधुनिक आणि पारंपारिक संस्कृतीचा सुरेख मिलाफ घडवून आणला.

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला अभिवादन करून सुरू झालेला हा सोहळा केवळ धार्मिक विधीपुरता मर्यादित राहिला नाही. गृहिणींच्या रोजच्या धावपळीतून विरंगुळा मिळावा म्हणून आयोजित केलेल्या स्पर्धांमध्ये महिलांनी लहान मुलांच्या उत्साहाने सहभाग घेतला.

संगीत खुर्चीत डिंपल पाटील यांनी बाजी मारली, तर वैभवी चव्हाण यांनी अटीतटीच्या लढतीत द्वितीय स्थान मिळवले.लिंबू-चमचा स्पर्धेत राखी पाटील



आणि सोनी चव्हाण यांनी आपल्या कौशल्याने उपस्थितांची मने जिंकली.लहान गटात उर्वशी चौधरी आणि पलक पाटील या चिमुकल्यांच्या उत्साहाने कार्यक्रमाची रंगत वाढवली.या सोहळ्याचे खास वैशिष्ट्य म्हणजे, केवळ विजेत्यांनाच नाही तर उपस्थित प्रत्येक कुटुंबाला समाजाच्या वतीने प्रेमभेट देऊन सन्मानित करण्यात आले. तिळगुळाच्या गोडव्यासोबतच विचारांची देवाणघेवाण महत्त्वाची असल्याचे मत चित्रा राजेंद्र चौधरी यांनी व्यक्त केले. त्या म्हणाल्या, समाज एकत्र येतो तेव्हाच सक्षमीकरणाची खऱ्या अर्थाने सुरुवात होते. एकमेकींना वाण देताना आणि उखाण्यांची जुगलबंदी रंगताना गुजर महिलांमधील एकोपा प्रकर्षाने दिसून आला. पलक दीपक चौधरी यांच्या ओघवत्या सूत्रसंचालनाने कार्यक्रमात शेवटपर्यंत जिवंतपणा टिकवून ठेवला.

# कोलंबी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत विशेष जनजागृती कार्यक्रम

दैनिक वादळ वार्ता
**नायगाव | प्रतिनिधी**

राज्यातील ग्रामपंचायती अधिक सक्षम, स्वयंपूर्ण व लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत नांदेड जिल्ह्यातील नायगाव तालुक्यातील कोलंबी येथे रविवार, दि. २९ जानेवारी रोजी विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामपंचायत कोलंबीच्या वतीने श्री शंकरराव चव्हाण विद्यालयाच्या पटांगणात सायंकाळी ७ ते ९ या वेळेत हा कार्यक्रम पार पडणार आहे.

या कार्यक्रमात सुप्रसिद्ध कीर्तनकार ह. भ. प. शिवलीलाताई पाटील यांच्या ओजस्वी कीर्तनातून ग्रामविकास, लोकसहभाग, स्वच्छता, पारदर्शक कारभार व मूल्याधिष्ठित समाजनिर्मितीचा संदेश दिला जाणार आहे. शासनाच्या विविध ग्रामविकास योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

या अभियानास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून दिशा मिळाली असून, ग्रामविकास व पंचायत राज विभागामार्फत प्रभावी जनजागृती करण्यात येत आहे. ग्रामस्थ, महिला, युवक व सर्व स्तरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक ग्रामपंचायत कोलंबीच्या वतीने करण्यात आले आहे.

## सुट्टीची सुचना

**२६ जानेवारी भारतीय प्रजासत्ताक दिना निमित्त दैनिक वादळ वार्ता कार्यालयास सुट्टी असल्याने २७ जानेवारी वार मंगळवार रोजी चा अंक प्रकाशित होणार नाही**

## न्यायप्रिय व्यक्ती सर्वोच्च पदावर असतील,तोपर्यंत लोकशाही सुरक्षित

# उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश सूर्यकांत यांचा सत्कार

**मुंबई | प्रतिनिधी**

न्यायप्रिय व्यक्ती देशाच्या सर्वोच्च पदावर असतील, तोपर्यंत आपल्या संविधानाला आणि लोकशाहीला कोणताही धोका नाही, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या सन्मानार्थ मुंबई उच्च न्यायालयात आयोजित भव्य सत्कार सोहळा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. त्याप्रसंगी ते बोलत होते.आधी अवघा ९ टक्के असलेला महाराष्ट्राचा दोषसिद्धी दर आज ४५ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे आणि तो ६० टक्क्यांपर्यंत नेण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे, सर्वसामान्यांना न्याय मिळण्यासाठी पायाभूत सुविधांवर भर देण्यात येत आहे, असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्ट केले.याचवेळी, कोल्हापूरच्या बहुप्रतीक्षित सर्किट बेंचला त्यांच्या कार्यकाळातच पूर्ण बेंचचा दर्जा देण्याची विनंती त्यांनी सरन्यायाधीशांकडे केली. यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील नागरिकांना न्याय अधिक जलद आणि सुलभपणे मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.मुंबई उच्च न्यायालयाच्यावतीने आयोजित या ऐतिहासिक कार्यक्रमात उपमुख्यमंत्री शिंदे यांनी न्याय, संविधान आणि सामाजिक समतेच्या मूल्यांवर आधारित भारताच्या न्यायव्यवस्थेचा गौरव केला. न्यायमूर्ती सूर्यकांत यांचे कार्य सूर्याप्रमाणे प्रकाशमान असून सामान्य नागरिकांना न्यायाची ऊर्जा देणारे आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.महाराष्ट्र आणि हरियाणा या दोन्ही राज्यांच्या शौर्यपरंपरेचा उल्लेख करत शिंदे यांनी दोन्ही भूमींच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशावर भाष्य केले. देश आज सुरक्षित आहे, कारण आपल्या सीमांवर जवान डटून उभे आहेत आणि शेतकऱ्यांच्या श्रमातून समृद्धी निर्माण होत आहे, असे त्यांनी सांगितले.हरियाणातील मध्यमवर्गीय कुटुंबातून आलेल्या न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी कठोर परिश्रम, प्रामाणिकपणा आणि न्यायनिष्ठेच्या बळावर देशाच्या सर्वोच्च न्यायपीठापर्यंत मजल मारल्याचे नमूद करत, शिंदे यांनी त्यांच्या जीवनप्रवासाला प्रत्येक तरुणासाठी प्रेरणादायी ठरवले.धारा ३७० रद्द करण्याचा निर्णय, वन रँक वन पेन्शन योजना, मतदार याद्यांशी संबंधित महत्त्वाचे आदेश, महिलांसाठी आरक्षणासंदर्भातील निर्देश तसेच अभिव्यक्ती स्वातंत्र्याबाबत दिलेले ठाम निर्णय यांचा उल्लेख करत त्यांनी न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या न्यायनिष्ठेचे कौतुक केले. आपल्या निर्णयांमुळे जनतेचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे, असे ते म्हणाले.पर्यावरणपूरक विकासावर भर देताना शिंदे यांनी चारधाम प्रकल्पासारख्या निर्णयांचे उदाहरण दिले. विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे हीच आजची खरी गरज आहे. पर्यावरण संवेदनशील विकासाची दिशा आपल्या निर्णयांतून स्पष्टपणे दिसते, असे शिंदे यांनी नमूद केले.राज्यातील न्यायव्यवस्थेच्या पायाभूत सुविधांबाबत माहिती देताना त्यांनी सांगितले की, २०२२ पासून राज्यात ३२ नवीन न्यायालयांची स्थापना करण्यात आली असून त्यात १४ अतिरिक्त सत्र न्यायालयांचा समावेश आहे. मुंबई उच्च न्यायालयासाठी नव्या भव्य इमारतीच्या उभारणीसाठी हजारो कोटी रुपयांचा खर्च करण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.दोषसिद्धी दराबाबत बोलताना शिंदे म्हणाले, या आधी महाराष्ट्राचा कन्विक्शन रेट केवळ ९ टक्के होता. आज तो ४५ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. मात्र, येथेच न थांबता तो ६० टक्क्यांपर्यंत नेण्यासाठी पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान आणि मनुष्यबळ वाढवण्यावर सरकार भर देत आहे.लोकशाहीतील न्यायपालिकेच्या महत्त्वावर भाष्य करत त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधानाबाबतचे विचार उद्धृत केले.

# संपादकीय

## निवडणूक विदर्भात साहित्य संघाची

महाराष्ट्रात जिथे राजकीय निवडणुकांची चाहूल नाही, तिथे विदर्भात मात्र एका वेगळ्याच 'निवडणुकीची' धडधड सुरू झाली आहे ती राजकारणाची नव्हे, तर साहित्याच्या सर्वोच्च व्यासपीठाची! जवळपास तीन दशकांनंतर विदर्भ साहित्य संघात खरी लोकशाही पाहायला मिळत असून, पंचवार्षिक निवडणुकीसाठी अध्यक्षपदाच्या रिंगणात तब्बल अकरा उमेदवार उतरल्याने साहित्य वर्तुळात प्रचंड उत्सुकता आणि चर्चांना उधाण आले आहे.महाराष्ट्रात १२ जिल्ह्यांमध्ये जिल्हा परिषद निवडणुका जाहीर झाल्या. मात्र त्यात विदर्भात एकही जिल्हा नाही. तरीही विदर्भात या आठवड्यात निवडणुकांचे वातावरण तापते आहे, मात्र ते फक्त साहित्य वर्तुळात.होय... विदर्भ साहित्य संघाच्या पंचवार्षिक निवडणुका आता जाहीर झाल्या आहेत. मधली जवळजवळ तीस वर्षे विदर्भ साहित्य संघात निवडणुका फक्त एकतर्फीच होत होत्या. कारण तिथे एकाच नेतृत्वाची अशी काही दहशत होते की दुसरा कोणीही मैदानात उतरण्याची हिंमत करत नसे. मात्र ही दहशत संपल्यामुळे यावेळी साहित्य संघात खऱ्या अर्थाने लोकशाही प्रस्थापित झाली आहे की काय असे वाटू लागले आहे. कारण पंचवार्षिक निवडणुका जाहीर होताच अध्यक्षपदासाठी एक-दोन नाही, तर चक्क ११ जण मैदानात उतरले आहेत. त्यामुळे निवडणुकांचे वातावरण आता चांगलेच तापलेले आहे.विदर्भ साहित्य संघ ही विदर्भातील सर्वात जुनी सक्रिय अशी संघटना राहिलेली आहे. या संघटनेला नुकतीच १०२ वर्षे झाली असून अनेक मान्यवर मराठी सारस्वतांनी या संघटनेचे नेतृत्व केलेले आहे. त्यात प्राचार्य राम शेवाळकर, डॉ. मधुकर आष्टीकर, प्रा. सुरेश द्वादशीवार, ग. त्र्यं.माडखोलकर, डॉ. वि. भि. कोलते, कवी अनिल अशा अनेक मान्यवरांचा समावेश आहे. आज या संस्थेचे जवळजवळ ९ हजार आजीवन सदस्य असून या संघटनेने एका काळात विदर्भाचे सांस्कृतिक आणि साहित्यिक क्षेत्र चांगलेच गाजवलेले आहे. नागपुरात भरवस्तीत एका काळात त्यांचे सुसज्ज असे नाट्यमंदिर धनवटे रंगमंदिर म्हणून प्रसिद्ध होते. तिथे अनेक गाजलेली नाटके होत असत. त्याशिवाय अनेक गाजलेले कार्यक्रम देखील झालेले आहेत. कित्येक संगीताच्या मैफलींनी इथे रात्रही जागवलेली आहे.मात्र मधल्या काळात या विदर्भ साहित्य संघाची भर वस्तीतील इमारत पुनर्विकासाच्या नावाखाली घराशयी केली गेली. त्याला तीन दशके लोटलेली आहे त्यानंतर तिथे अजूनही नवे रंगमंदिर उभे होऊ शकलेले नाही. मात्र तिथे निर्माण केलेल्या दहशतीमुळे ज्यांनी आवाज उठवण्याचा प्रयत्न केला त्यांना साहित्य संघातून बाहेर केले गेलेले आहे.मात्र आता परिस्थिती बदललेली आहे. त्यामुळेच यावेळी अध्यक्षपदाच्या निवडणुकीला ११ उमेदवार रिंगणात उतरलेले आहेत, तर कार्यकारिणी सदस्यांसाठी १११ अर्ज आलेले आहेत. अध्यक्षपदासाठी आलेल्या अकरा अर्जांपैकी नऊ अर्ज हे साहित्यिक आणि नाट्यकर्मी मंडळींचे आहेत. एक अर्ज विद्यमान अध्यक्ष प्रदीप दाते यांचा आहे, तर एक अर्ज आपणच विदर्भाचे सांस्कृतिक नेते आहोत असे प्रस्थापित करू बघणारे राष्ट्रवादी कॉँग्रेसचे नेते माजी आमदार डॉ. गिरीश गांधी यांचाही आहे. डॉ. गिरीश गांधींच्या उमेदवारीमुळे साहित्य वर्तुळात बऱ्याच चर्चा सुरू झालेल्या कानावर येत आहेत. डॉ. गिरीश गांधी हे मूळचे कॉँग्रेसचे नेते, आधी ते कॉँग्रेसमध्येच टी. जी. देशमुख यांसोबत होते. मग त्यांनी शंकरराव चव्हाण यांना जवळ केले होते. नंतर त्यांनी शरद पवारांशी जुळवून घेतले आणि त्यातून वर्षभराची आमदारकी देखील मिळवली होती. नंतर मात्र त्यांना पुढे काहीच मिळाले नाही. मात्र सर्वपक्षीय नेत्यांशी आणि उच्चपदस्थ अधिकाऱ्यांशी जुळवून घेऊन सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रात लुडबुड करणे हा त्यांचा आवडीचा उद्योग आहे. त्यातूनच ते केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याही जवळ सरकलेले आहेत. गडकरींसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन ते हौसेने करत असतात. विदर्भ साहित्य संघाचा अध्यक्ष हा साहित्यिक असावा असे अपेक्षित आहे. मात्र गिरीश गांधी यांचा साहित्याशी काही संबंध असल्याचे कोणतेही पुरावे नाहीत. त्यांनी लिहिलेला एकही लेख किंवा कथा किंवा कविता कोणाच्याही वाचण्यात आल्याचे ऐकलेले नाही. तरीही त्यांनी साहित्य संघाच्या अध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केला असून साहित्य संघाचे प्रशासन सुरळीतपणे चालावे यासाठी आपण अध्यक्षपदाच्या रिंगणात उतरलो असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. त्याचबरोबर आपण नितीन गडकरींचेच उमेदवार आहोत असेही ते भासवू बघत आहेत. त्यांच्या उमेदवारीमुळे नितीन गडकरींना आता साहित्य संघावर ताबा मिळवायचा आहे अशीही चर्चा साहित्य वर्तुळात सुरू झाली आहे. वस्तूतः गडकरींना तसे करण्याची गरज वाटत नाही. अशाप्रकारे संस्था ताब्यात घेण्याचा गडकरींचा स्वभाव देखील नाही. काही साहित्यप्रेमी त्यांच्याशी बोलले असता तिथले तुम्ही बघा तिथे कोणीही अध्यक्ष आला तरी मला फरक पडत नाही असे त्यांनी सांगितल्याचे बोलले गेले आहे. तरीही जर गांधी आपणच गडकरींचे उमेदवार असे प्रोजेक्ट करणार असतील, तर त्यामुळे नितीन गडकरींबद्दलच गैरसमज वाढू शकतात. म्हणूनच या प्रकारात आता नितीन गडकरींनीच खुलासा करावा अशी अपेक्षा साहित्य वर्तुळात व्यक्त होत आहे. मात्र गिरीश गांधी यांनी साहित्य संघात निवडणूक कशाला घ्यायची अशी अपेक्षा व्यक्त करत सर्व इच्छुक उमेदवारांनी एकत्र बसावे आणि त्यातून सहमतीने कार्यकारिणी निवडावी अशी सूचना केली आहे. तिथेही त्यांनी नितीन गडकरी यांना मध्यस्थी करायला लावावी आणि त्यांच्या सहमतीने कार्यकारिणी बनवावी असेही सुचवले आहे. मात्र गडकरींना मध्ये का आणायचे असाही प्रश्न साहित्य वर्तुळात विचारला जातो आहे. गडकरींना जर मध्ये आणले तर गिरीश गांधी आपले संबंध वापरून स्वतःलाच अध्यक्ष करून घेतील असाही सूर निघतो.दुसरे असे की, गिरीश गांधी हे मराठी भाषिक नाहीत. त्यामुळे अमराठी व्यक्तीला साहित्य संघाचे नेतृत्व का द्यायचे असाही प्रश्न निर्माण होतो आहे. अर्थात अमराठी असलेल्या अनेक साहित्यिकांनी मराठीत चांगले साहित्य निर्माण केले आहे. त्यात डॉ. यु. म. पठाण, रतनलाल सोनग्रा, पन्नालाल सुराणा, जवाहर मुथा, गिरीश जाखोटिया अशी नावे सांगता येतील. तसे गिरीश गांधींचे साहित्यात काहीही योगदान नाही. त्यामुळेच त्यांच्या नावाला साहित्यिक वर्तुळात चांगलाच विरोध असल्याचे बोलले जात आहे.गिरीश गांधींव्यतिरिक्त साहित्यिक डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी कादंबरीकार डॉ. रवींद्र शोभणे, झाडीबोलीचे साहित्यिक लखन सिंह कटरे, नाट्यकर्मी रंजन दारव्हेकर, प्रमोद भुसारी असे दिग्गज मैदानात उतरलेले आहेत. या सर्वांचे साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात निश्चितच मोलाचे योगदान आहे. शिवाय प्रशासनाचा देखील अनुभव आहे. त्यामुळे आता अध्यक्ष कोण होणार आणि कार्यकारिणीत कोण राहणार याकरिता साहित्य वर्तुळात आडाखे बांधणे सुरू आहे.अर्ज दाखल करण्याची अखेरची तारीख काल संपली. आता ९ फेब्रुवारीपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहेत. त्यानंतर लढतीचे चित्र स्पष्ट होणार आहे. मात्र आजची परिस्थिती बघता यावेळी निवडणुका चांगल्याच होतील आणि त्या चांगल्या रंगतीलही असे चित्र दिसत आहे.

# दावोसमध्ये महाराष्ट्राचा डंका! ३० लाख कोटींचे सामंजस्य करार

## १८ देशांमधून गुंतवणूक;मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिली माहिती

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सध्या दावोसच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी इथून महाराष्ट्रात किती गुंतवणूक आली आहे तसेच राज्याच्या कोणत्या भागात व कोणत्या क्षेत्रात गुंतवणूक आली आहे, यांची माहिती देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.देवेंद्र फडणवीस म्हणाले, दावोस दौरा यह अतिशय यशस्वी झाला आहे. मला सांगताना आनंद वाटतो की जवळपास गुंतवणुकीचे करार जे केले आहेत ते ३० लाख कोटी रुपयांचे आहेत. अजून ७-१० लाख कोटी पुढच्या काळात होणार आहे. ही जी काही गुंतवणूक आहे, यात इंडस्ट्री सेक्टर आहे, सर्व्हिस सेक्टर आहे, कृषी क्षेत्र आहे, सगळ्याच क्षेत्रात गुंतवणूक आपल्याकडे येत आहे. यातील ८३ टक्के जे काही करार आहेत, यात एफडीआय आहे. १६ टक्के गुंतवणूक अशी आहे ज्यात फायनॅनष्यल इंस्टीट्यूट असतील किंवा टेक्निकल आहेत, या गुंतवणुकी एफडीआय कमी आहे, पण फॉरेन टेक्नॉलजी आहेत.आता गुंतवणूक आली कुठे? तर महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागात ही गुंतवणूक आली आहे. कोकणचे क्षेत्र असेल किंवा एमएमआरचे क्षेत्र आहे, विदर्भात १३ टक्के गुंतवणूक आली आहे, ५० टक्के गुंतवणूक महाराष्ट्राच्या इतर भागांमध्ये आली आहे. यावेळी उत्तर महाराष्ट्रात नाशिक, जळगाव, अहिल्यानगर, नंदुरबार आणि धुळे या सगळ्या भागांमध्ये गुंतवणूक आली आहे. मराठवाड्याचे जे नवीन मॅगनेट तयार झाले आहे, ते आहे छत्रपती संभाजीनगर, याही ठिकाणी जवळपास ५५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आलेली आहे. नागपूर विभाग तसेच विदर्भ जो आहे, त्या ठिकाणी जवळपास २ लाख ७० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आलेली आहे. याचसोबत पुणे, सिंधुदुर्ग आणि रायगडमध्ये देखील चांगली गुंतवणूक आली असल्याची माहिती फडणवीस यांनी दिली आहे.देवेंद्र फडणवीस म्हणाले, अनेक मोठ्या कंपन्या आपल्याकडे गुंतवणूक करण्यास तयार झाले आहेत. यासोबत कुठल्या क्षेत्रात गुंतवणूक येत आहे ते देखील महत्त्वाचे आहे. यात क्वांटम कम्प्यूटिंग, एआय डेटा सेंटर, एआय टेक्नॉलजी, इलेक्ट्रॉनिक्स, फॅब सेमीकंडक्टर्स, जीसीसी, आपल्याकडे नवीन वेव ही जीसीसीची आहे. तसेच फूड प्रोसेसिंग, रिनिवेबल एनर्जि, ग्रीन स्टील, ईव्ही, अर्बन ट्रांस्फॉर्मेशन, शिप बिल्डिंग, एड्युकेशन, फीनटेक, मॅजिस्टिक आणि टेक्सटाइल तसेच डिजिटलमध्ये गुंतवणूक आली आहे.पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, एकूण किती देशातून गुंतवणूक आपल्याकडे येत आहे, याचा हिशोब लावला तर एकूण १८ देशातून ही गुंतवणूक आपल्याकडे येत आहे. यात अमेरिका, यूके, स्वित्झर्लंड, स्वीडन, सिंगापुर, नेदरलँड, जपान, इटली, यूएई, डेन्मार्क, नॉर्वे, फिनलंड, स्पेन, कॅनडा, बेल्जियम, ऑस्ट्रीया, अशा अनेक देशांतून गुंतवणूक येत आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, महाराष्ट्राचे परफॉर्मेंस सगळ्यात चांगला राहिला आहे. एक प्रकारे या कागदावरच्या घोषणा नाहीत. अनेकवेळा लोकांचा गैरसमज होत असतो, या गुंतवणुकीचा कालावधी जो असतो, हा ३ वर्षांपासून ते ७ वर्षांपर्यंत असते.

# उरण शहरात शिवसेना प्रणित शिवतेज व्यापारी असोसिएशनची स्थापना

## माजी आमदार मनोहरशेठ भोईर व माजी नगराध्यक्ष गणेश शिंदे यांच्या शुभहस्ते नामफलकाचे अनावरण सोहळा

दैनिक वादळ वार्ता
**उरण । प्रतिनिधी**



हिंदुरुदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून शुक्रवार दिनांक २३ जानेवारी २०२६ रोजी उरण शहरात शिवसेना प्रणित शिवतेज व्यापारी असोसिएशनची स्थापना करण्यात आली आहे, सदर व्यापारी असोसिएशनच्या नामफलकाचे अनावरण माजी आमदार मनोहरशेठ भोईर व माजी नगराध्यक्ष गणेश शिंदे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले, यावेळी माजी आमदार मनोहरशेठ भोईर व माजी नगराध्यक्ष गणेश शिंदे यांनी शिवतेज व्यापारी असोसिएशनची स्थापना करण्याचा मुख्य उद्देश विश्लेषण करताना म्हणाले की, उरण मध्ये एकच व्यापारी असोसिएशन आहे आणि त्यांच्या मोनोपोली मुळे उरण शहरातील ग्राहकांना व नागरिकांना खूप त्रास होतो, कधी कधी काही प्रकरण पोलीस स्टेशन पर्यंत गेलेली आहेत, अशा वेळी मराठी माणसांसाठी व इतर समाजाच्या लोकांसाठी एक हक्काची शिवसेनेची व्यापारी असोसिएशन असावी हा उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून आम्ही शिवतेज व्यापारी असोसिएशनची स्थापना करत आहोत असे सांगितले.या वेळी उरण तालुका संपर्कप्रमुख दीपक भोईर, शहरप्रमुख विनोद म्हात्रे, संपर्कप्रमुख गणेश म्हात्रे, शहर संघटक दिलीप रहाळकर, माजी उपनगराध्यक्ष परमानंद करंगुटकर, माजी विभागप्रमुख सूर्यकांत दरणे, नगरसेवक विकी म्हात्रे, मंगेश कासारे, महिला आघाडीच्या शहर संपर्क संघटिका व नगरसेविक श्रीमती वंदना पवार, शहर संघटिका मेघा मेस्त्री, शहर संघटिका विना तलरेजा, उपशहर संघटिका माधुरी चव्हाण, विभाग संघटिका रूपा सिंग, शाखा संघटिका लता राठोड, अल्पसंख्यांक सेलच्या शहर अध्यक्ष शादाब शेख, महिला अध्यक्षा मुमताज भाटकर, उपाध्यक्ष सायरा खान, सलीमा शेख, युवती सेनेच्या कु यशस्वी म्हात्रे,पत्रकार संघांचे अध्यक्ष घनश्याम कडू, माजी शहर संघटक महेश वर्तक, शाखाप्रमुख मिलिंद भोईर, इस्माईल शेख, अनिल पाटील, कमलाकर पाटील, ज्येष्ठ कार्यकर्ते रमाकांत म्हात्रे, अप्पा पठारे, मेहता, उमेश गीध, शिवा म्हात्रे, शैलेश पंडित, गुलजार भाटकर, विजय जाधव, ग्राहक संरक्षण कक्षाचे जिल्हा चिटणीस ओमकार घरत, तालुका संघटक कुणाल पाटील, संदेश पाटील, अभिषेक भोईर, उपशाखाप्रमुख फतेह खान, उपशहर अधिकारी सर्वेश गवस, सिद्धेश म्हात्रे, सर्व आजी-माजी पदाधिकारी, महिला आघाडी, युवासेना, अंगीकृत संघटनेचे पदाधिकारी व शिवसैनिक मोठया उपस्थित होते.

# दिव्यात रविवारी मोफत वंध्यत्व निवारण शिबीराचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**ठाणे । प्रतिनिधी**



निर्माण खतऋमधील उच्चतम तंत्रज्ञान आणि तज्ज्ञ डॉक्टर्सच्या मदतीने, तुमच्या किंवा तुमच्या घरातील सदस्यांचा आई-बाबा होण्याच्या स्वप्न साकार होणार आहे तर थोडक्यात आई-बाबा होण्याचं स्वप्न पूर्ण करता येणार आहे. डोंबिवली येथील गेली २५ वर्षाचे अनुभवी प्रसिद्ध डॉ. सौ माधुरी मानकर ( MD, DGO) व श्री राजेश मानकर (MD) यांच्या सेवांचा लाभ घेऊन तुमच्या कुटुंबात नवीन सदस्याच्या आगमनाची तयारी करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. गर्भधारणेत अडचणी असलेल्या जोडप्यांसाठी दिव्यात मोफत वंध्यत्व निवारण शिबीराचे येत्या आयोजन करण्यात आले आहे. सदर शिबिराचे रविवार, दि. २५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ६.३० दरम्यान कुसुम Nx हॉस्पिटल, C-01, रिलायन्स टॉवर, गंगोत्री अपार्टमेंट, मुंब्रा कॉलनी रोड, दत्त मंदिर, रेल्वे ब्रिज जवळ, दिवा (पूर्व) येथे आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी आपले नाव नोंदणीवर मोफत सल्ला, मोफत वीर्य तपासणी, मोफत सोनोग्राफी करण्यात येणार असून दिवेकरांनी या संधीचा फायदा घेण्याचे डॉ. मानकर यांनी आवाहन केले आहे. अधिक माहितीसाठी वेबसाईट www.nirmanivf.in d https://gqr.sh/CS-Y वर जाऊन आमचे रिव्ह्यूव पाहू शकता.

# राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त ठाणे जिल्हा परिषदेत लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ

दैनिक वादळ वार्ता
**ठाणे । प्रतिनिधी**



भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार तसेच उपरोक्त संदर्भिय पत्राअन्वये राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून लोकशाही मूल्यांप्रती निष्ठा ठेवण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद ठाणे येथे सर्व अधिकारी व कर्मचारी यांना लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ देण्यात आली. या अनुषंगाने जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत सर्व शासकीय कार्यालयांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आज, दि. २३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हा परिषद इमारतीच्या आवारात शपथ घेण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास जिल्हा परिषद कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.राष्ट्रीय मतदार दिनाचे महत्व अधोरेखित करताना, लोकशाही व्यवस्थेवर दृढ विश्वास ठेवणे, संविधानिक मूल्यांचे पालन करणे, मुक्त व निष्पक्ष निवडणूक प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेणे तसेच मतदानाचा हक्क बजावणे, या बाबींविषयी उपस्थितांना शपथ देण्यात आली. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी अंजली अंबेकर, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय किर्ती डोईजोडे, लेखाधिकारी रविंद्र सकपाळ, सहाय्यक प्रशासन अधिकारी श्रीकांत खंडागळे, कनिष्ठ सहाय्यक लेखाधिकारी मनोज देवकर, ग्रामपंचायत अधिकारी हिरामण खाडे तसेच जिल्हा परिषद ठाणे येथील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमातून लोकशाही मूल्यांचे संवर्धन, नवमतदारांमध्ये जागृती निर्माण करणे तसेच नागरिकांमध्ये मतदानाविषयी सकारात्मक दृष्टिकोन वाढविणे, हा उद्देश साध्य करण्याचा प्रयत्न जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.

# ठाणे जिल्हा माहिती कार्यालयात सुरक्षा आणि पर्यावरण वर्ष उपक्रमाचा शुभारंभ

दैनिक वादळ वार्ता
**ठाणे । प्रतिनिधी**




ठाणे जिल्हा माहिती कार्यालय, प्रादेशिक परिवहन विभाग ठाणे आणि वेसॅक इंडिया (VesacIndia) यांच्या संयुक्त विद्यमाने '२०२६- सुरक्षा आणि पर्यावरण वर्ष' या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा शुभारंभ आज ठाणे जिल्हा माहिती कार्यालय येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. रस्ते सुरक्षा सर्वांच्या दैनंदिन जीवनात अंगीकारली जावी आणि ती मानवी जीव वाचवणारा सकारात्मक 'छंद' म्हणून विकसित व्हावी, हा मोहिमेचा मुख्य संदेश उद्घाटन समारंभातून अधोरेखित करण्यात आला. यासाठी जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांचे विशेष मार्गदर्शन लाभले आहे.प्रसंगी वाहतूक पोलीस उपायुक्त पंकज शिरसाठ, कोकण विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष मनोज जालनावाला, जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी रोहित काटकर, वेसॅक इंडियाचे संस्थापक व सुरक्षा-अभ्यासक विजयकुमार कट्टी, माहिती अधिकारी प्रवीण डोंगरदिवे तसेच ठाणे जिल्हयातील पत्रकार उपस्थित होते. रस्ते सुरक्षा महिन्याच्या पार्श्वभूमीवर आजच्या कार्यक्रमात '१५ चिन्हे - १५ कथा' पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. रस्ते वाहतूक संकेतांवरील १५ बोधकथांचे हे विशेष पुस्तक मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले. मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषांमधील हार्ड कॉपी, ई-कॉपी आणि ऑडिओबुक असे सर्व पर्याय नागरिकांसाठी उपलब्ध करण्यात आले आहेत. "R.E.A.C.H.' Responsibility, Empathy, -wareness, Compassion संकल्पनेवर आधारित ७८ रस्ते सुरक्षा पोस्टर्सचे अनावरण करण्यात आले. ही सर्व डिझाईन्स प्रादेशिक परिवहन विभाग व वाहतूक विभागाच्या मानकांनुसार तयार केल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. वाहतूक पोलीस उपायुक्त पंकज शिरसाठ यांनी रस्ता सुरक्षा ही केवळ शासनाची नव्हे तर प्रत्येक नागरिकाची वैयक्तिक व सामूहिक जबाबदारी असल्याचे स्पष्ट केले. अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी वेगमर्यादा पाळणे, हेल्मेट व सीटबेल्टचा अनिवार्य वापर ही मूलभूत पण अत्यंत महत्त्वाची पावले असल्याचे त्यांनी सांगितले.वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांपेक्षा नियमांचे पालन करणारे नागरिक समाजासाठी प्रेरणादायी ठरतात, यावर त्यांनी भर दिला.

# न्यायाचार्य श्री नामदेव महाराज शास्त्री लिखित ज्ञानेश्वरी भावानुवाद अध्याय आठवा 'ई-बुक'चे लोकार्पण

## भावानुवादाची मोफत पीडीएफ फाईल मिळवण्यासाठी ९७६४९३१००८ वर मेसेज करावा

दैनिक वादळ वार्ता

भगवानगड (प्रतिनिधी): श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती, श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांनी वारकरी सांप्रदायाला दिशादर्शक असणारे संपूर्ण ज्ञानेश्वरी ग्रंथ भावानुवाद लिखाणाचे महत्वपूर्ण काम हाती घेतलेले आहे. त्यापैकी ८ व्या अध्यायाच्या भावानुवाद ई-बुक ग्रंथाचे आज श्री क्षेत्र भगवानगड येथून लोकार्पण झाले आहे. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्रीजी हे पारंपरिक वारकरी संप्रदायातील प्रवचनकार व कीर्तनकार असून त्यांचे सुरुवातीचे शिक्षण आळंदीतील वारकरी शिक्षण संस्थेत झाले. त्यानंतर संस्कृत साहित्यात सर्वात कठीण असणाऱ्या न्यायशास्त्राचं शिक्षण श्रीगुरू श्री १००८ स्वामी काशिकानन्दगिरीजी महाराज द्वादशदर्शनाचार्य आनंदवन आश्रम कांदिवली मुंबई येथे गुरुकुल पद्धतीने ९ वर्षे शिक्षण घेऊन वाराणशी विद्यापिठाची 'न्यायाचार्य' ही पदवी संपादन केली. तसेच पुणे विद्यापीठातुन एम ए(मराठी) करून 'वारकरी संतांची कुटरचना' या विषयावर मराठवाडा विद्यापीठातून पि एच् डी संपादन केली. श्री क्षेत्र भगवानगडाचे द्वितीय उत्तराधिकारी वै.गुरुवर्य श्री संत भीमसिंह महाराजांच्या वैकुंठगमनानंतर १० नोव्हेंबर २००३ पासून श्री क्षेत्र भगवानगडाच्या गादीचे उत्तराधिकारी म्हणून ते भगवानगडाची जबाबदारी सांभाळत आहेत. त्यांचे ज्ञानेश्वरी व संस्कृतचे अध्ययन-अध्यापन चालू आहे. पारंपरिक व आधुनिक दोन्ही अभ्यास असणारे असे हे वक्ते आहेत. त्यांचे किर्तन व प्रवचन ज्ञानेश्वरी अभ्यासकांसाठी अत्यंत उपयुक्त असून यात मानसिक समस्येचे समाधान आहे. वै.श्री संत भगवानबाबांचा वारसा पुढे चालू ठेवत त्यांनी गडावरील मंदिराचा मोठा विकास केला आहे. आळंदी, पंढरपूर, पैठण व छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी भगवानगडाचे मोठे मठ त्यांनी ऊभारले आहेत. तसेच श्री क्षेत्र भगवानगड येथे श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांचे भव्य दगडी मंदिर उभारण्यात येत असुन वारकरी शिक्षण देणारे ज्ञानेश्वरी विद्यापीठ २००४ साली स्थापन करून वारकरी संप्रदायाचा प्रचार व प्रसार करण्याचे काम सुरू आहे. भाविकांना कीर्तन व प्रवचन ऐकण्यासाठी त्यांचे नामदेव शास्त्री ऑफिशियल व आनंदाचे सिद्धांत हे दोन चॅनेल समाज माध्यमांवर उपलब्ध आहेत. श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा लिखित ज्ञानेश्वरी भावानुवाद अध्याय १ ते ८ अध्यायांची पीडीएफ फाईल मोफत आपल्या मोबाईलवर मिळवण्यासाठी ९७६४९३१००८ या नंबरवर मेसेज करावा.



### बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयातील साहित्य खरेदी गैरव्यवहार प्रकरण

# लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी साठी शासनाकडे तपास परवानगीची मागणी

दैनिक वादळ वार्ता

मुंबई । प्रतिनिधी

बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयातील साहित्य खरेदी व विक्री उपकरणे प्रक्रियेत झालेल्या कथित गैरव्यवहार आणि भ्रष्टाचाराच्या तक्रारीवरून आता प्रशासकीय आणि कायदेशीर हालचालींना वेग आला आहे. या प्रकरणात राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाने सार्वजनिक आरोग्य विभागाला तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत, तर दुसरीकडे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) संशयित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कायदेशीर चौकशी करण्यासाठी शासनाच्या परवानगीची प्रतीक्षा असल्याचे स्पष्ट केले आहे.देऊळगाव राजा येथील सामाजिक कार्यकर्ते श्री.चंद्रकांत ज्ञानदेव खरात यांनी बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयातील साहित्य खरेदीमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याची तक्रार नोंदवली होती. त्यांनी यापूर्वी १५ सप्टेंबर, २२ सप्टेंबर आणि २६ सप्टेंबर २०२५ रोजी विविध स्तरावर निवेदने दिली होती. त्यानंतर १८ डिसेंबर २०२५ रोजी पुन्हा या तक्रारीचा पाठपुरावा केला होता.या तक्रारीची दखल घेत मंत्रालयातील सामान्य प्रशासन विभागाने (GAD) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या उपसचिवांना पत्र पाठवून या प्रकरणात नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत कक्ष अधिकारी विद्या पाटील यांनी या पत्राद्वारे आरोग्य विभागाला खरात यांच्या तक्रारीतील मुद्द्यांवर तातडीने लक्ष घालण्यास सांगितले आहे.







**ACB चौकशीच्या फेऱ्यात अधिकारी?**

सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) या प्रकरणाला गांभीर्याने घेतले आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या मुंबई कार्यालयाने अपर मुख्य सचिवांना (सार्वजनिक आरोग्य विभाग) पत्र लिहून स्पष्ट केले आहे की: जिल्हा शल्य चिकित्सक आणि संबंधित २१ अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ च्या कलम १७-अ अन्वये तपास/चौकशी तसेच गुन्हे दाखल करण्याची परवानगी मागण्यात आली आहे.

हा प्रस्ताव गेल्या काही काळापासून प्रलंबित असून, अद्याप आरोग्य विभागाने यावर कोणताही निर्णय कळवलेला नाही.एसीबीने आता स्मरणपत्र पाठवून या तक्रारीवर काय निर्णय घेतला आणि पुढील तपासासाठी परवानगी कधी मिळणार, याची विचारणा केली आहे. तक्रारदार श्री. खरात यांनी जिल्हा शल्य चिकित्सकांसह अनेक कर्मचाऱ्यांवर भ्रष्टाचाराचे थेट आरोप केले आहेत. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने चौकशीसाठी हिरवा कंदील मागितल्यामुळे, आरोग्य विभाग आता यावर काय भूमिका घेतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. जर परवानगी मिळाली, तर बुलढाणा आरोग्य विभागातील अनेक मोठ्या अधिकाऱ्यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# २७ जानेवारीपासून सेनगावमध्ये उपोषण

### भूखंडधारकांचा तहसील कार्यालयासमोर आंदोलनाचा इशारा

दैनिक वादळ वार्ता

सेनगाव । प्रतिनिधी

नगर पंचायत हद्दीतील गट क्रमांक ९४४ मधील भूखंडधारकांकडून त्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी दि. २७ जानेवारीपासून तहसील कार्यालयासमोर सतत धरणे आंदोलन व उपोषण करण्यात येणार असल्याचा इशारा जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आला आहे.भूखंडांची खरेदी-विक्री होऊन संबंधितांकडून पैसे स्वीकारण्यात आले असून कराची वसुलीही करण्यात आली आहे. मात्र, सातबारा उताऱ्यावर नावे नोंदविण्याच्या प्रक्रियेत प्रशासनाकडून दिरंगाई होत असल्याचा आरोप भूखंडधारकांनी केला आहे.यापूर्वी ७ मार्च २०२५ रोजी झालेल्या उपोषणानंतर ५४०० चौरस फूट मोकळी जागा व ३० फूट रस्त्याचे मोजमाप करून ताबा देण्याचे लेखी आश्वासन देण्यात आले होते. यासाठी ५४ हजार रुपये शुल्कही आकारण्यात आले, मात्र अद्याप कोणतीही अंमलबजावणी झालेली नाही, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.या प्रकरणात भूखंडधारकांना धमक्या, अडथळे व दडपशाहीला



सामोरे जावे लागत असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. चार ते पाच दिवसांत ठोस८ निर्णय न झाल्यास आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.या आंदोलनात दीपक गाढवे, समाधान शिंदे, लताबाई प्रधान, गीताबाई गाढवे, शोभा शिंदे, गणेशराव जारे, गणेश मुटकुळे, जगदीश जांगिड, रामेश्वर वाकळे, नागनाथ रोडगे यांच्यासह अनेक भूखंडधारक सहभागी होणार आहेत.

# राज्यातील विद्यापीठांशी संबंधित विविध विषयांवर आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळेचे मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

दैनिक वादळ वार्ता

पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण व्यवस्थेला नव्या उंचीवर नेण्याच्या उद्देशाने उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत राज्यातील विद्यापीठांशी संबंधित विविध विषयांवर विचारमंथन करण्यासाठी आयोजित एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे उद्घाटन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यशाळेच्या माध्यमातून राज्यातील उच्च शिक्षण अधिक गुणवत्तापूर्ण, कौशल्याधारित व रोजगाराभिमुख करण्यासाठी आवश्यक धोरणात्मक बाबींवर सखोल चर्चा करण्यात आली.या कार्यक्रमास उच्च शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी, राज्य प्रकल्प संचालक राजेंद्र भारुड, उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर, तंत्रशिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्यासह राज्यातील सर्व विद्यापीठांचे





कुलगुरू, प्राध्यापक व शिक्षणतज्ज्ञ उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने उच्च शिक्षण व्यवस्थेच्या बळकटीसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले. मंत्री श्री. पाटील यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि इन्फ्लिबनेट केंद्र, गांधीनगर यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. या वेळी इन्फ्लिबनेटच्या संचालिका प्रा. डॉ. देविका मदल्ली उपस्थित होत्या. या सामंजस्य कराराअंतर्गत राज्य संस्थात्मक क्रमवारी प्रणाली आणि राज्य उच्च शिक्षण माहिती व्यवस्थापन प्रणाली या एकात्मिक वेब-आधारित प्रणालींची रचना व विकास करण्यात येणार असून, यामुळे उच्च शिक्षणातील गुणवत्ता, पारदर्शकता तसेच डेटा-आधारित निर्णय प्रक्रिया अधिक सक्षम होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.राज्याच्या शैक्षणिक विकासासाठी मानवी भांडवल, अर्थव्यवस्था व उच्च शिक्षणाधारित ज्ञान अर्थव्यवस्था या विषयांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांच्या पाचव्या राष्ट्रीय परिषदेतील मुद्द्यांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने अपर मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी सुकाणू समितीमार्फत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीचा आढावा सादर केला. तसेच गुणवत्ता व जागतिक मानांकनाच्या अनुषंगाने विद्यापीठांचा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील दर्जा सुधारण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक राजेंद्र भारुड यांनी मार्गदर्शन केले. राज्य संशोधन निधी, महाज्ञानदीप प्रकल्प तसेच पीएम उषा आणि सीएम उषा या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीबाबतही यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.दरम्यान, भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी उपस्थितांना मतदानाची शपथ दिली.

# पाटस टोल प्लाझावर 'सडक सुरक्षा-जीवन रक्षा'चा संदेश; हेल्मेट अवेअरनेस बाईक रॅली

दैनिक वादळ वार्ता

पाटस । योगेश राऊत

रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने तसेच नागरिकांमध्ये सडक सुरक्षा - जीवन रक्षा या संदेशासह हेल्मेट वापराचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी शुक्रवार, दि. २३ जानेवारी २०२६ रोजी पाटस टोल प्लाझा येथे भव्य रोड सेफ्टी जनजागृती व हेल्मेट अवेअरनेस बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले.पुणे-सोलापूर एक्सप्रेस वे प्रायव्हेट लिमिटेडच्या वतीने आयोजित या रॅलीला कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) शशी भाटिया यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून औपचारिक सुरुवात करण्यात आली. पाटस टोल प्लाझा येथून सुरू झालेली ही बाईक रॅली पाटस गावातून मार्गक्रमण करत पुन्हा पाटस टोल प्लाझा येथे यशस्वीरीत्या समाप्त झाली.या कार्यक्रमात बारामती आरटीओ संजय भापकर, तसेच एपीआय सागर ढाकणे व त्यांच्या पथकाने





सहभाग घेतला. उपस्थित नागरिकांना वाहतूक नियमांचे पालन, दुचाकीस्वारांसाठी हेल्मेट वापराचे अनन्यसाधारण महत्त्व आणि सुरक्षित वाहनचालन याबाबत त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.ही बाईक रॅली पुणे-सोलापूर एक्सप्रेस वे प्रायव्हेट लिमिटेडचे सेफ्टी ऑफिसर वसीम मुल्ला यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत सुरक्षित व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली.कार्यक्रमास प्रोजेक्ट हेड फणी कुमार मुला, मेंटेनन्स मॅनेजर सुरजीत सिंग, प्लाझा मॅनेजर प्रविण कांबळे, महाराष्ट्र सुरक्षा बलाचे प्रभारी अधिकारी प्रल्हाद रोटे व गुलाब शेख यांची उपस्थिती लाभली.तसेच बारामती ट्रॅफिक पोलीस विभागातील एपीआय सागर ढाकणे, पीएसआय महाले, पीएसआय चव्हाण, एएसआय होले, एएसआय धंगेकर, हवालदार गायकवाड, गरुड, मेहेर, सोनवणे तसेच पोलीस कॉन्स्टेबल शिंदे यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मोलाचे सहकार्य केले.या उपक्रमातून हेल्मेट वापर, वाहतूक नियमांचे काटेकोर पालन व सुरक्षित वाहनचालनाबाबत नागरिकांमध्ये सकारात्मक व प्रभावी संदेश देण्यात आला. रस्ते सुरक्षिततेसाठी अशा उपक्रमांची नितांत गरज असल्याचे मत यावेळी उपस्थितांनी व्यक्त केले.

# रमाई घरकुल योजना २०२४- २५ चे अनुदान उपलब्ध करून द्यावे; अहेरी नगरपंचायतीचे नगरसेवक अमोल मुक्कावार यांची मागणी

दैनिक वादळ वार्ता

अहेरी । प्रतिनिधी

रमाई आवास योजनेचा अनुदान तत्काळ उपलब्ध करून लाभार्थ्यांना द्यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा नगरसेवक अमोल मुक्कावार यांनी समाज कल्याण गडचिरोलीचे सहाय्यक आयुक्त यांना निवेदन देऊन मागणी केली आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, नगर पंचायत अंतर्गत सन २०२३ २४ या वर्षात अंदाजे ६० घरकुल रमाई आवास योजनेअंतर्गत मंजूर झालेले होते व बहुतांश लाभार्थ्यांचे घरकुलाचे बांधकाम ७० टक्क्यांच्या वर झालेले आहे उर्वरित बांधकाम पूर्ण करणे करिता लाभार्थ्यांना अनुदान देणे गरजेचे आहे त्यामुळे नगरपंचायत क्षेत्रातील रमाई आवास योजनेतील निधी तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावी अशी मागणी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण विभाग गडचिरोली यांना अहेरी नगरपंचायतीचे नगरसेवक अमोल मुक्कावार यांनी निवेदनातून केली आहे.



## जिथे शिक्षणाचे मूल्य जपले जाते, तिथेच मुले खऱ्या अर्थाने घडतात–उपशिक्षणाधिकारी भगवान सोनवणे

# तुलसी इंग्लिश स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा जल्लोषात संपन्न; विद्यार्थ्यांच्या कलागुणांनी वेधले बीडकरांचे लक्ष






दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

पालक नशीबवान आहेत की त्यांची मुले अशा शाळेत शिक्षण घेत आहेत, जिथे खऱ्या अर्थाने शिक्षणाची जाण जपली जाते. रोडे सरांच्या दूरदृष्टीमुळेच या संस्थेतून सुसंस्कृत व जबाबदार पिढी घडत आहे. जिथे शिक्षणाचे मूल्य जपले जाते, तिथेच मुले खऱ्या अर्थाने घडतात, असे गौरवपूर्ण प्रतिपादन जिल्हा परिषद बीडचे उपशिक्षणाधिकारी भगवान सोनवणे यांनी केले. येथील तुलसी इंग्लिश स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलन सोहळ्याच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. पांगरी रोडवरील सौभाग्य लॉन्स येथे रंगलेल्या या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे होते. त्यांनी संस्थेच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेत विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.अर्जुन राठोड, प्रा.राम गायकवाड, प्रा.भारत मगर,प्रा.प्रदीप गाडे, आयु.दीपा रोडे, प्रा.अकांक्षा सोनवणे, प्रा.शिवराम शिवगिरे आदी मान्यवर उपस्थित होते.उपशिक्षणाधिकारी सोनवणे यांनी आपल्या मार्गदर्शनात प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीचा दाखला देत विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा मंत्र सांगितला. विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात काकदृष्टी, बकध्यानम्, श्वाननिद्रा, अल्पभोजी व गृहत्यागी ही पाच लक्षणे अंगीकारली पाहिजेत. ही मूल्ये विद्यार्थ्याला शिस्तबद्ध बनवून मातृभूमीच्या सेवेसाठी सदैव तत्पर ठेवतात, असे त्यांनी नमूद केले.

स्नेहसंमेलनात शाळेच्या चिमुकल्यांपासून ते माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी एकापेक्षा एक सरस सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. देशभक्तीपर गीते, कोळीगीते, लावणी तसेच आदिवासी नृत्य सादरीकरणांनी कार्यक्रमात विशेष रंगत आणली. पारंपरिक व विविध वेशभूषांमधून विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृतीचे प्रभावी दर्शन घडवले.

आपल्या पाल्यांना रंगमंचावर कला सादर करताना पाहून पालकांच्या चेहऱ्यावर समाधान ओसंडून वाहत होते. सौभाग्य लॉन्सचा परिसर विद्यार्थ्यांच्या जयघोषाने व टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेला. शाळेच्या प्राचार्या उमा जगतकर व संपूर्ण शिक्षक–शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शिस्तबद्ध नियोजनामुळे हा सोहळा अत्यंत यशस्वी ठरला. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन करून राष्ट्रगीताने या अविस्मरणीय सोहळ्याची सांगता करण्यात आली.

# हळदी कुंकू कार्यक्रमावेळी केली महिलांची आरोग्य तपासणी



दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

दि.२४/०१/२६ रोजी मकर संक्रांत निमित्त चाल हळदीकुंकू महिलांच्या स्नेह मिलन कार्यक्रमातून साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या प्राचार्य डॉ .कविता कराड मॅडम यांच्या स्नेह मिलन कार्यक्रमात माननीय नरेंद्रजी मोदी परिचारिका प्रशिक्षण संस्थेच्या वतीने महिलांचे बीपी ,वजन तपासणी करून सामाजिक बांधिलकी जपण्याचा उपक्रम राबवण्यात आला तसेच वारकरी संप्रदायाचा दिंडी सोहळा देखावा साकारून अध्यात्मिक संस्कृतीचे दर्शनही घडवून आणले. या उपक्रमात माननीय आमदार सौ.नमिता ताई मुंदडा यांचा बीपी चेक करताना विद्यार्थिनी व आयोजिका डॉ.कविताताई कराड. तसेच आमदार ताई नी दिंडी त पावले खेळून त्याचाही आनंद घेतला. सामाजिख उपक्रमाचे सर्व महिला भगिनींकडून कौतुक करण्यात आले. प्रसंगी माजी आमदार संगीता ताई ठोंबरे,नगराध्यक्ष सिताताई बनसोड, उपनगर अध्यक्षा शितलताई दांगट, शैलजा इंगळे,तांबवा गावच्या सरपंच दिपालीताई चाटे, इंगळे मॅडम व असंख्य महिला भगिनींनी उपस्थिती दर्शवून कार्यक्रमाचा आनंद घेतला. मोठ्या संख्येने महिला भगिनी उपस्थित राहिल्याबद्दल कराड मॅडम यांनी महिलांचे आभार व्यक्त केले.

# चंद्रपूर गडचिरोली महामार्गावरील अपघात ग्रस्त रुग्णांना आ.विजय वडेट्टीवार यांची भेट

## दु:खाच्या क्षणी आधाराचा हात–उपचाराकरिता रुग्णांना केली मदत



दैनिक वादळ वार्ता
**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आज दुपारच्या सुमारास हिरापूर टोल नाक्याजवळ भीषण अपघात घडला.यात ब्रम्हपुरी मतदार संघातील अनेकांचा समावेश असल्याची माहिती मिळताच क्षणाचाही विलंब न करता घडलेल्या अपघातात जखमी झालेल्या रुग्णांच्या वेदना समजून घेण्यासाठी विधिमंडळ पक्षनेते आ. विजय वडेट्टीवार स्वतः गोंदिया येथून पुढील सर्व दौरा कार्यक्रम स्थगित करून गडचिरोली रुग्णालयात दाखल झाले. उपचार सुरू असलेल्या रुग्णांच्या खाटेजवळ उभे राहून त्यांनी प्रत्येकाची आस्थेने चौकशी केली, शब्दांनी धीर दिला आणि डोळ्यांतूनच मायेचा आधार दिला.

आज घडलेल्या या भीषण अपघातात ब्रह्मपुरी विधानसभा क्षेत्रातील अनेक ग्रामीण खेड्यातील नागरिकांचा प्रवासी म्हणून सहभाग आहे. आपले निकटवर्तीय कार्यकर्ते, मतदार तथा इतर सर्व सामान्य जखमी रुग्णांची अवस्था पाहून आ. वडेट्टीवार भावूक झाले. डॉक्टरांकडून उपचारांची सविस्तर माहिती घेत एका क्षणाचाही विलंब न होता सर्वोत्तम उपचार मिळालेच पाहिजेत अशा ठाम सूचना त्यांनी दिल्या. कुणालाही आर्थिक, प्रशासकीय किंवा वैद्यकीय अडचण भासू नये, यासाठी सर्वतोपरी मदत करण्याचे त्यांनी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना आश्वासन दिले. तसेच अपघातात काही गंभीर जखमी रुग्णांना नागपूर येथील मेडिकल कॉलेज तथा एम्स रुग्णालयात पुढील उपचाराकरिता तात्काळ पाठवण्याची सुविधा विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी उपलब्ध करून दिली.अपघातामुळे हादरलेल्या कुटुंबीयांच्या अश्रूंना पुसत त्यांनी त्यांच्याशी संवाद साधला. तुम्ही एकटे नाहीत, मी तुमच्यासोबत आहे, हे शब्द नातेवाईकांसाठी मोठा आधार ठरले. लोकप्रतिनिधी केवळ निवडणुकीपुरते नव्हे, तर संकटाच्या काळातही जनतेसोबत उभा असतो, याचे जिवंत उदाहरण या भेटीतून दिसून आले.

या संवेदनशील भेटीमुळे रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या मनात दिलासा निर्माण झाला. दु:खाच्या क्षणी माणुसकी जपणारा नेता म्हणून आ. विजय वडेट्टीवार यांची असलेली सर्व दूर ओळख आज अनेकांना प्रत्यक्ष अनुभवयास मिळाली.

# तीन वर्षांपासून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या आरोपीच्या आवळल्या मुसक्या; अंभोरा ठाण्यातील दोन कर्मचाऱ्यांवर केला होता हल्ला



दैनिक वादळ वार्ता
**आष्टी । प्रतिनिधी**

पाहिजे,फरार मधील आरोपीच्या शोधकामी एका वस्तीवर गेलेल्या दोन पोलीस कर्मचाऱ्यांवर सहा जणांच्या टोळक्याने अचानक हल्ला चढवल्याने ते जखमी झाल्याची घटना घडताच धुम ठोकणारा आरोपी तीन वर्षांपासून पोलिसांना गुंगारा देत होता.अखेर शुक्रवारी पहाटेच्या दरम्यान राहत्या घरी त्याच्या मुसक्या आवळण्यात आल्या.बबन उर्फ संदिप सोमनाथ भोसले वय वर्ष ३८ रा.पारोडी ता.आष्टी असे अटक आरोपीचे नाव आहे.आष्टी तालुक्यातील अंभोरा ठाणे हद्दीतील एका वस्तीवर १९ मे २०२२ मध्ये पासिजे,फरारी आरोपीच्या शोधकामी गेलेल्या दोन पोलीस अंमलदारावर बबन उर्फ संदिप सोमनाथ भोसले वय वर्ष ३८ याच्यासह पाच जणांनी अचानक हल्ला चढवल्याने दोनही अंमलदार जखमी झाल्याची घटना घडली होती. चार आरोपीना तेव्हाच अटक करण्यात आली होती.आणि तेव्हापासून यातील आरोपी हा वास्तव बदलून पोलिसांना गुंगारा देत होता.शुक्रवारी पहाटेच्या दरम्यान तो पारोडी येथील राहत्या घरी आल्याची गोपनीय माहिती अंभोरा पोलिसांना मिळताच त्यांनी भल्या पहाटे घराला वेढा घालून धाड टाकून त्याच्या मुसक्या आवळल्या.ही कामगिरी अंभोरा ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे,पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत तावरे,आदिनाथ भडके,पोलिस हवालदार अतुल दाताळ,अमोल शिरसाट, सतीश पैठणे,शिवदास केदार, जयराम उबे,हरिभाऊ बांगर यांनी केली

## सातपुड्याच्या डोंगरदऱ्यात पळस बहरला

# लाल गडद,केशरी रंग असलेली फुले करत आहेत प्रवाशांना आकर्षित



दैनिक वादळ वार्ता
**मोलगी । रविंद्र वळवी**

नंदुरबार जिल्ह्यातील सातपुडा पर्वतरांगात सध्या चोहीकडे मोठ्या प्रमाणात पळसाची झाडे ही फुलांनी बहरली आहेत. लालगडद व केशरी रंगाच्या फुलांनी बहरलेली पळसाची झाडे सध्या डोंगरदर्यातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे लक्ष वेधून घेत आहेत. डोंगराळ भागात तसेच शेत शिवारातील अनेक झाडे ही फुलांनी लगडलेल्या पळसाच्या झाडांनी शोभून दिसत आहेत.

थंडी काही प्रमाणात ओसरायला लागली असून पानगळीने उघडी पडलेली झाडे ही नव्या पालवीचे लेणे अंगावर मिरवायला लागली की, वसंत ऋतूची चाहूल लागते. या वसंतात रंगांची उधळण सुरू होते. निसर्गाच्या शिशिर ऋतूत बोडक्या झालेल्या डोंगराला केशरी लाल रंगात न्हाऊ घालणारा पळस बहरला आहे. वसंताचे स्वागत करण्यासाठी पळसाची झाडे फुलांनी नटलेली चोहीकडे पहावयास मिळत आहे. झाडाच्या प्रत्येक फांदीवर लागलेली फुले विस्तवाच्या गोळ्या सारखी दिसत आहेत.

सर्वदूर अशी म्हण आहे की, कुठेही गेले तरी पळसाला पाणी तीनच. पळसाची पानेही फार उपयोगी आहेत पूर्वी पानांपासून मोठ्या पंक्तीला जेवण देण्यासाठी द्रोण आणि पत्रावळ्या बनवल्या जायच्या मात्र आता ते कालबाह्य झाले आहे.

पळसाचे झाड हे डोंगराळ भागात किंवा एखाद्या शेतकऱ्याच्या बांधावर दिसून येते डोंगराळ भागात प्रत्येकाचे लक्ष वेधून घेताना हे झाड सहज दिसते.त्यात बहरात आलेला पळस तर अक्षरशः एखाद्या अग्निजवाळे सारखा दिसू लागतो.

पूर्वी धुलीवंदनात एकमेकांच्या अंगावर टाकण्यासाठी रंग बनवण्यासाठी पळस फुलांचा वापर केला जात होता तर आता आयुर्वेदिक औषधी म्हणूनही या फुलांचा वापर होत असतो. पळसाची फुले पाण्यात टाकून स्नान केले तर त्वचा रोग नाहीसा होतो. त्याचबरोबर पळसाच्या फुलांचा काढा करून पिल्यास किडनीचे विकार दूर होतात.

असे केशरी व लाल गडद रंगाची फुलं ही पाळसाच्या झाडावर शोभून दिसत आहेत.

# शीतलताई दांगट यांच्या हळदी कुंकू कार्यक्रमास महिलांचा प्रचंड प्रतिसाद




दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज नगरीच्या उपनगराध्यक्षा सौ.शितल पशुपतीनाथ दांगट यांनी येथील मुक्ताई मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या प्रा.सुरेश साळुंखे यांचा होम मिनिस्टर स्मार्ट मिनिस्टर खेळ पैठणीचा क्षण आनंदाचा या कार्यक्रमाने खास महिलांसाठी मकर संक्रांतीच्या निमित्ताने हळदीहकुंकूचा कार्यक्रम घेण्यात आला या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी आ.सौ.संगिताताई ठोंबरे सौ.अर्चनाताई आडसकर, सौ.रेवतीताई सोनवणे, प्रा.कविताताई कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला या कार्यक्रमास महिलांचा मोठ्या उपस्थित होत्या या हळदी कुंकू कार्यक्रमात महिला करिता खेळ पैठणीचा क्षण आनंदाचा हा स्पर्धात्मक खेळ घेण्यात आला यात विजयी होणा–या विजेत्यास प्रथम व्दितीय व तृतीय विजेत्या महिलांना पैठणी साडी बक्षीस म्हणून देण्यात आली. या कार्यक्रमास महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घेऊन विविध बक्षीसाची लयलूट केली शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सौ.शितल पशुपतीनाथ दांगट यांनी मानले.

# कासारशिरसी येथे शिवा संघटनेचा ३१ वा वर्धापन दिन भव्य मेळाव्याने साजरा होणार



दैनिक वादळ वार्ता
**लोहा । प्रतिनिधी**

कासारशिरसी (ता. निलंगा) येथे विरशैव–लिंगायत हृदयसम्राट शिवा संघटनेचा ३१ वा वर्धापन दिन बुधवार, दि. २८ जानेवारी २०२६ रोजी अत्यंत भव्य स्वरूपात साजरा होणार आहे. यानिमित्त दुपारी १२.१५ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास शिवा संघटनेचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे सर अध्यक्ष व उद्घाटक म्हणून उपस्थित राहणार असून, विविध लोकप्रतिनिधी, सामाजिक नेते तसेच धार्मिक व आध्यात्मिक गुरुवर्यांची उपस्थिती लाभणार आहे. या मेळाव्यात विरशैव–लिंगायत समाजाच्या संघटनशक्तीचे, शिस्तीचे व एकतेचे दर्शन घडविले जाणार आहे.

या वर्धापन दिनानिमित्त ढोल–ताशांच्या गजरात समाजाची अस्मिता जपण्याचा संदेश देण्यात येणार असून, कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिवा संघटनेचे लोहा तालुकाध्यक्ष रविराज होळगे यांनी केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077